# प्रकरण - ७

# उपसंहार

# प्रकरण - ७

# उपसंहार

मराठी काव्यामध्ये आद्य कवयित्रींचा मान महदंबाकडे जातो. महदंबेचे 'धवळे' व 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' ही मराठीतील पहिली कथाकाव्ये होत. मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई आदी संत कवयित्रींनी स्त्रीसुलभ भाषेतून लिहिलेल्या अभंगामधून भक्तिभावाचे चित्र रेखाटले. या संत कवयित्रींच्या काव्यामागील प्रेरणा भक्ती होती. त्याचे काव्य म्हणजे भक्तीच्या उत्कट अनुभूतीच सात्विक आविष्कार आहे.

१९ व्या शतकाच्या मध्यात स्त्री शिक्षणाला प्रारंभ झाला व अडसरांची स्त्रीला स्वत:ला हळूहळू जाणीव होत गेली. अनेक सुधारक लोकनेत्यांनी सार्वजनिक पातळीवर स्त्रीच्या हक्कांसाठी लढा दिला. महात्मा जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे यांची नावे या सुधारकांमध्ये अग्रक्रमाने येतात. त्यांनी चळवळी उभारल्या, संस्था स्थापन केल्या, जनजागृतीच्या मोहिमा आखल्या. या सुधारकांच्या जोडीला हळूहळू विचारी आणि धीट असे काही सर्व सामान्य गृहस्थ उभे राहिले. त्यांनी कुटुंबातील स्त्रियांना काही प्रमाणात स्वातंत्र्य दिले. शिक्षणाची संधी दिली.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला स्त्री काव्याचे संग्रह स्वतंत्रपणे संपादित व प्रकाशित होऊ लागले. गीत व गाणे स्वरुपाची ती रचना होती. पारंपारिक लोक संस्कृती मधील गीतांचा तो एक आविष्कार होता. प्रपंचाशी निगडीत गोष्टींवरच हे काव्य आधारीत आहे. सोज्वळ व शालीन अभिव्यक्ती हे या काव्याचे विशेष. १९५० पर्यंतची कविता रंजन, आनंद, हौस आणि गरज अशा प्रेरणामधून निर्माण झाली.

१९५१ साली लक्ष्मीबाई टिळकांच्या कवितांचा 'भरली घागर' हा संपादित संग्रह प्रकाशित झाला. त्या पाठोपाठ बहिणाबाई चौधरींच्या 'अहिराणी' बोलीतील कविता प्रकाशित झाल्या. हे दोन्ही काव्यसंग्रह खऱ्या अर्थाने स्त्रीमनाचे प्रतिनिधित्व करणारे होते. ग्रामीण व मध्यमवर्गीय स्त्रीच्या संवेदना, भाव-भावना, निसर्ग, नातेसंबंध यांचे प्रभावी चित्रण या काव्यसंग्रहामधून झाले.

१९५० नंतरचा कालखंड स्त्रीकाव्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा आहे. संजीवनी मराठे, इंदिरा संत, शांता शेळके, अनुराधा पोतदार, पद्मा गोळे, शिरीष पै ह्या या कालखंडातील प्रसिद्ध कवयित्री. या कालखंडातील स्त्री कवयित्रींच्या काव्यामध्ये स्त्रीवादी काव्याच्या पाऊलखूणा आढळतात. नवकाव्याच्या जोरदार प्रवाहामध्ये आपापले स्थायी भाव व आत्मभान निग्रहीपणे या कवयित्रींनी प्रकट केले.

१९७५ साली जागतिक महिला वर्ष म्हणून साजरे झाले. जागतिक महिला परिषदेने महिला दशक घोषित केले. स्त्री मुक्ती चळवळीतून 'स्त्रीवादी' साहित्याचा पुरस्कार करण्यात आला. अशा साहित्याचे वेगळे निकष सांगण्यात आले आणि जगभरातील महिला साहित्यिकांनी अशा स्वरुपाचे स्त्रीवादी लेखन जोमाने निर्माण करण्यास सुरुवात केली.

स्त्रीवादी साहित्यात स्त्रीचे शरीरानिष्ठ अनुभवांचे आविष्करण, मनोविश्लेषण, वास्तवपूर्ण समाजचित्रण, स्त्रीकेंद्री भाषिक अभिव्यक्ती, स्त्रीसमस्या, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार यासारखी वैशिष्ट्ये प्रमाणभूत मानण्यात आली. कादंबरी, कथा, काव्य आणि वैचारिक लेखनातून स्त्रीवादाच्या पुरस्कारास व प्रचारास प्रारंभ झाला. मराठी साहित्यात कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, शिरीष पै, सानिया, मेघना पेठे, छाया दातार, विद्या बाळ इत्यादी आघाडीच्या स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखल्या जातात.

काव्याच्या प्रांतामध्ये मल्लिका अमर शेख, निरजा, अश्विनी धोंगडे, प्रज्ञा लोखंडे, पद्मा गोळे, रजनी परुळेकर इत्यादी आघाडीच्या स्त्रीवादी कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. आधुनिक कवयित्रींची कविता काळाशी संवाद व संगती राखणारी आहे. जीवनमूल्यांची, प्रापंचिक भूमिकेची, स्त्री व स्त्रीत्वाची जुनी संदर्भ चौकट आधुनिक कवयित्रींनी मोडून टाकली आहे. स्त्री मनाचा विमुक्त व विविधांगी आविष्कार आधुनिक कवयित्रींच्या काव्यात झाला आहे. असे असले तरी याच काळात पूर्वापार संकेत, रचना असलेले रंजनवादी काव्यही मोठ्या प्रमाणात लिहिले गेले. स्त्री कवयित्रींची कविता या रंजनवादी वर्तुळात फिरत होती. त्याला धक्का देण्याचे काम स्त्रीवादी कविता करत आहे.

आधुनिक मराठी साहित्यात विशेष दमदारपणे आणि प्रगल्भ चिंतन करुन विविध वाङ्मयशास्त्रा-मध्ये निर्मिती करणाऱ्या लेखिकांमध्ये डॉ. अरुणा ढेरे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कविता, कथा, ललित लेखन, संशोधन, आस्वाद, समीक्षा, लोकसाहित्य, सामाजिक, इतिहास यासारखे विविध वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले आहेत. 'प्रारब्ध', 'यक्षरात्र', 'मंत्राक्षर', 'निरंजन', 'जावे जन्माकडे', 'निळ्या पारदर्शक अंधारात' हे त्यांचे कवितासंग्रह असून 'यक्षरात्र', 'निरंजन', 'मंत्राक्षर' या कविता संग्रहांना विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

'मंत्राक्षर' कविता संग्रहामध्ये लहान मुलीपासून नवथर तरुणी व संसारी स्त्रियांपासून विधवा, परित्यक्ता व वृद्ध स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण अरुणा ढेरे यांनी केले आहे. आदिबंध, मिथकांचा वापर करुन आधुनिक स्त्रीच्या दु:खाचा वेध त्यांनी घेतला आहे. या स्त्री चित्रणामध्ये वास्तवता आहे. मुलीचे भविष्य वेगळे पाहणारी आई त्यांनी पाहिली आहे. स्त्रीच्या स्वचे, आस्मितेचे केंद्र म्हणून आदिबंधात्मक घराची कल्पना आली आहे. घराइतकाच त्याच्या बाजूच्या पर्यावरणाचा विचार अरुणा ढेरे यांनी केला

आहे. स्त्री-पुरुष प्रेमाचे प्रगल्भ दर्शन त्यांच्या काव्यातून होते. स्त्री-पुरुषाचे नाते शरीराधिष्ठित असते हे स्पष्टपणे त्यांनी सांगितले आहे. पुरुष मनाचा सहानुभावाने वेध घेणारी तरल संवेदनशीलता त्यांच्या कवितेमध्ये आहे. स्त्री केंद्रीत शब्द प्रतिमा, निसर्ग प्रतिमा आदिबंधात्मक प्रतिमा व मिथकांचा उपयोग त्यांनी आपल्या कवितांमध्ये केला आहे. स्त्रीजीवनाचे पारंपारिक- सांस्कृतिक आयाम झुगारुन न देता आधुनिक स्त्री जीवनाच्या आकांक्षेचे संदर्भ या कवयित्रीच्या काव्यातून येतात.

'निरंजन' कवितासंग्रहामध्ये अरुणा ढेरे यांनी देशीय परंपरेचा वारसा समजून-उमजून आपल्या काव्यामध्ये उतरवला आहे. त्यातून आधुनिक स्त्रीच्या सुख -दु:खांकडे चिकित्सकदृष्टीने पाहिले आहे. प्रीतीच्या विविध छटाचा आविष्कार निरंजनमध्ये झाला आहे. स्मृतीसंवेदना व्यक्त करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत. महानगरीय संस्कृतीला सामोरे जाताना मनात निर्माण होणारे भयनाट्य त्यांच्या कवितांमधून येते. देशीयवाणाचा यशस्वी उपयोग, आदिबंध मिथकांचा उपयोग, निसर्गप्रतिमा व स्त्रीकेंद्रीत प्रतिमांचा उपयोग निरंजन काव्यसंग्रहात अरुणा ढेरे यांनी केला आहे.

इ. स. १९९० नंतरच्या कवयित्रींमध्ये डॉ. अरुणा ढेरे यांचे काव्यलेखन वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'मंत्राक्षर' व 'निरंजन' कवितासंग्रहातील कवितांमधून स्त्री जाणिवांचे जाणते-समंजस आविष्करण झाले आहे. स्त्री जाणिवेतील आत्मभान आणि समाजभान सतर्कतेने मांडले गेले आहे. प्रचारकी थाट नाही. आक्रस्ताळा शब्दप्रपंच नाही. लोकरंगातून, आदिबंधातून, पौराणिक मिथकातून, ग्रामभूमीतून, महानगरीय चक्रातून स्त्री जाणिवांचे विविध पदर-पोत स्वाभाविकतेने आविष्कृत करताना स्त्रीवादाचे सूचन झाले आहे. आधुनिक साहित्यात येणारे स्त्रीवादाचे काटे-कंगोरे, निकष, राग-रंग अरुणा ढेरे यांच्या 'निरंजन' आणि 'मंत्राक्षर' मधील कवितेस लावता येणार नाहीत.

त्यांच्या कवितांमधून स्त्रीवादाचा समर्थ पण स्वतंत्र उच्चार आढळतो. स्त्रीवादी असल्याच्या मर्यादा किंवा अन्यायाचा गळेकाढू आकांत किंवा बंड करण्याची प्रवत्ती, बंधने तोडण्याचा आग्रह या कुठल्याही टोकाच्या परिणामाला त्यांची कविता जात नाही. मानवी नातेसंबंधाची जाण, स्त्री-पुरुष प्रेमाचे प्रगल्भ दर्शन, निसर्ग व माणूस यांच्यासंबंधाची अभिव्यक्ती करणारी त्यांची कविता आहे. स्त्री केंद्रीत अभिव्यक्ती, स्त्री विश्वाच्या प्रतिमा, प्राचीन स्त्री मिथके या सगळ्यामधून आधुनिक स्त्रीचे चित्र त्या रेखाटतात. परिस्थिती विरोधात बंड करणारी बंडखोर स्त्रीवादी कविता त्यांनी लिहिली नसली तरी स्वत:वर ठाम विश्वास असणाऱ्या आधुनिक स्त्रीच्या भावविश्वाला त्यांनी समर्थपणे पुढे आणले आहे. त्यांनी रेखाटलेली स्त्री शांत, संयमी असली तरी आपला ठाव व स्वाभिमान न सोडणारी आहे. म्हणूनच स्त्रीवादाचा एक विचारी व समर्थ उच्चार त्यांच्या काव्यामध्ये दिसून येतो. त्यांच्या 'मंत्राक्षर' व 'निरंजन' मधील कवितेचा स्त्रीवादी दृष्टीने शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

-----x-----